# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना कमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग


कॉम्पलेक्स परिसर, एम.आय.डी.सी. रोड, | दुरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७१३२-२२३३२०

गडचिरोली - ४४२६०५ | ईमल : director.boee@unigug.ac.in


जा. क्र. गों.वि/परीक्षावि./6400/२०२४ | दि. ०८/११/२०२४

# परीपत्रक

**विषय :- हिवाळी २०२४ करीता घोषीत केलेल्या वेळापत्रकात बदल झाल्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या मा.प्राचार्य/प्राचार्या, विद्यार्थी, पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विभाग प्रमुख तसेच संबंधितांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०२४-२५ मधील हिवाळी - २०२४ च्या सर्व अभ्यासक्रमांच्या सत्र व्दितीय, चतुर्थ, सहावे, आठवे आणि दहावे (Sem-II, IV, VI, VIII & X) या सत्रातील परीक्षा दिनांक २३ आक्टोंबर, २०२४ पासून सुरु झालेल्या आहेत. तसेच सत्र प्रथम, तिसरे, पाचवे, सातवे आणि नववे (Sem-I, III, V, VII & IX) या सत्रातील हिवाळी २०२४ नियोजीत नियमित परीक्षा दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ पासून सुरु करण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने पदवी व पदवीव्युत्तर परीक्षांचे सर्व वेळपत्रक विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेले होते, मात्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ दिनांक २० नोव्हेबंर, २०२४ रोजी मतदान असल्यामुळे विद्यापीठाला प्राप्त पत्रानुसार केंद्राधिकारी व सहकेंद्राधिकारी यांना विधानसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक १३/११/२०२४ व १४/११/२०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने प्रशिक्षण कार्यशाळा असल्याचे पत्र वितरीत झालेले आहे. तसेच विद्यापीठाच्या परिक्षा विभागातील महिला कर्मचारी सोडुन इतर सर्व कर्मचा-यांच्या सेवा निवडणुकी पर्यत जिल्हा निवडणुक अधिकारी यांनी अधिग्रहीत केल्या आहेत. यामुळे विद्यापीठाने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार परिक्षा घेण्यास अडचणी निर्माण होत आहे. त्या अनुषंगाने खालील नमूद रकान्यानुसार सदर पेपरच्या परीक्षेच्या दिनांकात बदल करण्यात येत आहे, यांची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव व सेमीस्टर | पुर्वीची दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| **१** | **सर्व पदवी व पदवीव्युत्तर अभ्यासक्रम** | **दिनांक १३/११/२०२४** | **दिनांक ०८/१२/२०२४** |
| **२** | | **दिनांक १४/११/२०२४** | **दिनांक १५/१२/२०२४** |

वरीलप्रमाणे दिनांकात बदल करण्यात आलेली आहे. वेळेमध्ये व परीक्षा केद्रामध्ये कुठलाही बदल करण्यात आलेला नाही, तरी संबंधित विषयांच्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**मा. कुलगुरु महोदयाच्या आदेशान्वये,**

08/11/2024

(डॉ. प्रविण अ. पोटदुखे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रतिलीपी :-**

१. मा. कुलगुरु यांचे स्वियसहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली सदर परीपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावे.
४. गोपनिय विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती व कार्यावाहीस्तव सादर.
५. व्यवस्थापक, एम के सि एल यांना माहितीस्वत सादर